क्र.पोमसं/३३/७१२५/तपास अनुदान/४०/२०१८ मुंबई, दिनांक : ०७/०३/२०१

विषय :- तपास अनुदान २०१८-१९
महाराष्ट्र पोलीस दलातील तपास अधिकारी व कर्मचा-यांना पोलीस ठाणे घटक पातळीवर गुन्हे तपास दरम्यान झालेल्या खर्चाबाबत

*****

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र पोलीस दलातील तपासी अधिका-यांना पोलीस ठाणे / घटक पातळीवर गुन्हे तपास दरम्यान झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी पोलीस तपास फंड (Investigation Fund) २०५५०१६८ या लेखाशिर्षाखाली "५०-इतर खर्च " या उद्दिष्टाखाली मंजूर करण्यात येतो.

२. सन २०१८-१९ या वित्तिय वर्षाकरिता घटक प्रमुखांना गुन्हे तपासा दरम्यान झालेल्या खर्चासाठी "मागणी क्र. बी-००१, २०५५-पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल, "५०-इतर खर्च" (दत्तमत) (२०५५०१६८)" या लेखाशिर्षाखाली नमूद करण्यात येणारे तपास फंडासाठी घटक निहाय एकूण रु. १४,२२,४८,०००/- (रुपये चौदा कोटी बावीस लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) इतक्या अनुदानाचे बीडीएस् प्रणालीवर वाटप करण्यात आले आहे. सदर बीडीएस् प्रणालीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये काही घटक प्रमुखांनी वाटप करण्यात आलेल्या तपास फंडामधील अनुदान खर्च केल्याचे दिसून येत नाही.

३. तरी खालील घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, सन २०१८-१९ या वित्तिय वर्षात त्यांना वाटप करण्यात आलेल्या तपास अनुदान मार्च २०१९ अखेर खर्च करण्यात यावा. सदर तपास फंडामधील अनुदान खर्ची न केल्यास त्याबाबतची कारणे / खुलासे शासनास सादर करावी लागतात. त्याची सर्वस्वी जबाबदारी विभाग प्रमुखाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**(अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधीक्षक